धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शासकीय कामात अडथळा; आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**

शासकीय कामकाज करत असलेल्या पोलिसांच्या कार्यात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ जून २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास जहागीरदारवाडी शिवारातील रेल्वे पुलाजवळील रस्त्यावर पोलीस कर्मचारी अविनाश दिगंबर शिंदे हे आपल्या सहकाऱ्यांसह शासकीय कामकाज करत होते. त्यावेळी आरोपी आकाश विनायक राठोड, अशोक जानराव राठोड, अतुल राजेंद्र पवार, प्रल्हाद राठोड तसेच इतर पाच जण (सर्व रा. जहागीरदारवाडी, ता. जि. धाराशिव) यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून वाहन आडवे लावले. यावेळी येथे तुम्ही गुन्हे दाखल करायचे नाहीत असे म्हणत आरोपींनी पोलिसांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी अविनाश दिगंबर शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### एकुरगा येथे खरीपपूर्व मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**उमरगा, ९ जून -**

उमरगा तालुक्यातील एकुरगा येथे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर ८ जून रोजी खरीपपूर्व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आत्मा प्रकल्प व कृषी विभागाच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमात शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती, बीबीएफ पद्धत, बीजप्रक्रिया, सोयाबीन बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी तसेच शाश्वत शेती तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक एम.यू. सय्यद यांनी नैसर्गिक निविष्ठा निर्मिती व दशपर्णी अर्काचे प्रात्यक्षिक सादर केले, तर किशोर करके आणि पी.बी. गर्जे पाटील यांनी बीजप्रक्रिया व उगवण क्षमता तपासणीचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमास परिसरातील अनेक शेतकऱ्यांची उपस्थिती लाभली. नैसर्गिक शेतीचा अवलंब करून उत्पादनवाढ साधण्याचे आवाहन यावेळी कृषी विभागाने केले.



### अबोली महाबोलेचा दिशा पतसंस्थेकडून सत्कार

**नळदुर्ग, ९ जून -**

येथील अबोली राजेंद्र महाबोले हिने प्रतिकूल आर्थिक परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर कंप्युटर इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली. तिच्या या यशाबद्दल दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने तिचा व वडील राजेंद्र महाबोले यांचा सत्कार करण्यात आला. अबोलीने तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयातून कंप्युटर इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. तिच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून विद्यार्थ्यांनी तिचा आदर्श घ्यावा, असे मत नगरसेवक तानाजी जाधव यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

### तेरखेड्याच्या शुभम शिंदेची केंद्रीय गुप्तचर विभागात निवड

**वाशी, ९ जून -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील शुभम विलास शिंदे याने स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत केंद्रीय



गुप्तचर विभागाच्या (खइ) असिस्टंट सेंट्रल इंटेलिजन्स ऑफिसर (उखज) पदावर निवड मिळवली आहे. राज्य राखीव पोलीस दलात कार्यरत असलेले वडील विलास शिंदे यांच्याकडून मिळालेली शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभावाची प्रेरणा तसेच स्वतःची मेहनत व जिद्द यांच्या बळावर शुभमने हे यश संपादन केले. तेरखेडा हे गाव शिक्षण, नोकरी व व्यवसाय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी ओळखले जाते. गावातील अनेक युवक विविध शासकीय सेवांमध्ये कार्यरत असून स्पर्धा परीक्षांमध्येही सातत्याने यश मिळवत आहेत. शुभमच्या निवडीमुळे तेरखेडा गावाच्या शिरपेचात आणखी एक मनाचा तुरा रोवला गेला असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गटारींचे सांडपाणी घराघरांत; बलसुर ग्राम पंचायतीच्या कारभाराविरोधात नागरिकांचा संताप





**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.९ जून -**

बलसुर गावात सध्या विकासाच्या दाव्यांपेक्षा गटारीच्या सांडपाण्याचीच अधिक चर्चा सुरू आहे. गावातील अनेक भागांमध्ये गटारी तुंबल्याने सांडपाणी रस्त्यांवरून वाहत असून काही ठिकाणी ते थेट नागरिकांच्या अंगणात आणि घरांपर्यंत पोहोचत असल्याचे चित्र आहे. या समस्येमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असतानाही ग्रामपंचायतीकडून अपेक्षित तत्परता दिसून येत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

गावाच्या विकासासाठी विविध योजनांची घोषणा केली जाते, कामांचे भूमिपूजन आणि उद्घाटनेही केली जातात.

मात्र दुसरीकडे गावातील मूलभूत प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबितच राहत असल्याचे वास्तव समोर येत आहे. नागरिकांच्या घरात आणि रस्त्यावर गटारीचे सांडपाणी शिरत असताना विकासाच्या घोषणा नेमक्या कोणासाठी केल्या जात आहेत, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार,

### विकासाच्या घोषणांचा गजर; मात्र मूलभूत सुविधांसाठी बलसुरकरांची अजूनही प्रतीक्षा

या समस्येबाबत अनेक वेळा ग्रामपंचायत कार्यालयाकडे तक्रारी करण्यात आल्या.

मात्र आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी नागरिकांमधील संताप दिवसेंदिवस वाढत आहे. गावातील स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन आणि मूलभूत सुविधांबाबत ग्राम पंचायत गंभीर नसल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. गावातील रस्त्यांवरून वाहणारे सांडपाणी, तुंबलेल्या गटारी आणि वाढणारी दुर्गंधी ही ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्क्रियतेची साक्ष देत असल्याची चर्चा गावात सुरू आहे. वेळोवेळी प्रश्न मांडूनही त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याने प्रशासनावरील विश्वास डळमळीत होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

विशेष म्हणजे, बलसुरमध्ये एवढी गंभीर समस्या निर्माण झाली असताना गावातील पुढारी, पदाधिकारी आणि स्वतःला गावाच्या विकासाचे शिल्पकार म्हणवून घेणारे नेते नेमके कुठे आहेत, असा प्रश्नही नागरिक उपस्थित करत आहेत. सामाजिक माध्यमांवर विकासाच्या पोस्ट करणारे अनेक पुढारी गावातील वास्तव परिस्थितीबाबत मात्र मौन बाळगत असल्याची चर्चा आहे. नागरिकांच्या घरात गटारीचे सांडपाणी शिरत असताना एकही जबाबदार व्यक्ती पुढे येऊन ठोस भूमिका घेताना दिसत नसल्याने नाराजी अधिकच वाढली आहे.

> ग्रामपंचायतीच्या ढिसाळ नियोजनामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत ग्रामपंचायतीला जाब विचारला असता उडवाउडवीची उत्तरे मिळतात. केवळ आश्वासने देऊन वेळ मारून नेली जाते, प्रत्यक्षात मात्र प्रश्न मार्गी लागत नाही.
>
> **- मुजतबा इनामदार, ग्रामस्थ**

बलसुरकरांची मागणी अत्यंत साधी आणि रास्त आहे. गावातील सर्व गटारींची तातडीने साफसफाई करावी, सांडपाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करावी आणि नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करावी. अन्यथा ग्रामस्थ अधिक आक्रमक भूमिका घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गावातील प्रत्येक समस्येवर भाषणे होतात, पण गटारी साफ करण्यासाठी मात्र प्रशासनाकडे वेळ नाही. विकासाच्या मोठमोठ्या घोषणा होत असल्या तरी नागरिकांना मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर त्या विकासाचा उपयोग काय? असा संतप्त सवाल आता बलसुरकर उघडपणे विचारू लागले आहेत.

### तुळजाभवानी मंदिर परिसरात स्वच्छतेचा कडक बडगा..

## थुंकल्यास किंवा कचरा टाकल्यास ५०० रुपयांचा दंड




- : मंदिर परिसरात दोन विशेष पथके तैनात...
- : दोन शिफ्टमध्ये होणार गस्त व कारवाई...
- : थुंकणे, घाण करणे व कचरा टाकण्यास मनाई...
- : नियमभंग करणाऱ्यांकडून ५०० रुपयांचा दंड वसूल केला जाणार
- : स्वच्छ व पवित्र मंदिर परिसरासाठी सहकार्याचे आवाहन...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात स्वच्छता राखण्यासाठी मंदिर प्रशासनाकडून वारंवार सूचना देण्यात येत असतानाही काही व्यक्तींकडून परिसरात थुंकणे तसेच कचरा टाकण्याचे प्रकार सुरू असल्याचे आढळून आले आहे. याची गंभीर दखल घेत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानने मंदिर परिसर स्वच्छ व पवित्र राखण्यासाठी दोन विशेष पथकांची स्थापना केली आहे.

मंदिर संस्थानच्या सहायक स्वच्छता निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली ही पथके कार्यरत राहणार असून थुंकणाऱ्या व कचरा टाकणाऱ्या व्यक्तींवर थेट कारवाई करण्यात येणार आहे. सकाळी ६ ते दुपारी २ आणि दुपारी २ ते रात्री १० अशा दोन शिफ्टमध्ये ही पथके मंदिर परिसरात गस्त घालून नियमभंग करणाऱ्यांवर लक्ष ठेवणार आहेत.

या पथकांमध्ये मंदिर संस्थानचे चार शिपाई तसेच सुरक्षा सेवा पुरवठादार कंपनी SISPL चे दोन सुरक्षा रक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंदिर परिसरात थुंकणे, घाण करणे किंवा कचरा टाकताना कोणी आढळल्यास संबंधित व्यक्तीवर ५०० रुपयांचा दंड आकारण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मंदिर परिसराची स्वच्छता, पावित्र्य आणि सौंदर्य अबाधित राखण्यासाठी सर्व भाविकांनी स्वच्छतेचे नियम पाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## उमरग्यात दिवसाढवळ्या घरफोडी; लाखांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ जून -**

उमरगा शहरातील डिग्गी रोड परिसरात अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून सुमारे २ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अब्दुल वाहब शमशोद्दीन शेख (लदाफ) (वय ३८, रा. डिग्गी रोड, उमरगा) यांच्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने ८ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील २४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच १२ तोळे चांदीचे दागिने असा एकूण २ लाख ७५ हजार २५० रुपयांचा ऐवज चोरून नेला. या घटनेप्रकरणी अब्दुल वाहब शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी करून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू केला असून पुढील तपास सुरू आहे.

## पार्श्व अनुकंपा ट्रस्टकडून इटकळ येथे गरजवंत विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.९ जून -**

तुळजापूर तालुक्यातील इटकळ व परिसरातील गरजवंत शालेय विद्यार्थ्यांसाठी पार्श्व अनुकंपा ट्रस्टच्या वतीने शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. शिक्षणासाठी आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांना आधार देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

मुंबईस्थित पार्श्व अनुकंपा ट्रस्ट गेल्या दहा वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवत असून सर्वसामान्य व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करत आहे. याच उपक्रमांतर्गत यावर्षी इटकळ येथील एकता मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात सुमारे १०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

प्रत्येक विद्यार्थ्याला पाच लाँग बुक, कंपास पेटी, पेन्सिल तसेच पाच पेन देण्यात आले. ट्रस्टचे संस्थापक तथा सीए निलेश शहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमास पार्श्व अनुकंपा ट्रस्टचे नागेश वाघमारे, जगदेवी वाघमारे, मेजर रफिक मुजावर, रामभाऊ सोनटक्के, नामदेव गायकवाड, इरय्या स्वामी, तम्मा स्वामी, इरफान भांबरते, ब्रह्मनंद भोसले, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत लोहार आणि मेजर सुभाष राठोड यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश सलगरे यांनी केले. भविष्यातही ग्रामीण भागातील गरजवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदतीचा हात देत राहणार असल्याचा संदेश पार्श्व अनुकंपा ट्रस्टचे संस्थापक सीए निलेश शहा यांनी आपल्या प्रतिनिधीमार्फत दिला.

## गोलेगाव निवासी शाळेत मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**

गोलेगाव येथील अनुसूचित जाती मुलांच्या शासकीय निवासी शाळेत झालेल्या मारहाणीच्या घटनेत १५ वर्षीय विद्यार्थ्याचा डावा डोळा गंभीर जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. पवन आसाराम तावडे (रा. तातवडे, ता. मुळशी, जि. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २७ मार्च रोजी शाळेतील भांडणादरम्यान झालेल्या मारहाणीत त्यांच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली असून डोळा निकामी झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क; जिल्ह्यातील १३ प्रकल्पांतील पाणी केवळ पिण्यासाठी राखीव

### मान्सून लांबण्याच्या शक्यतेमुळे प्रशासनाचा प्रतिबंधात्मक निर्णय; अवैध पाणी उपशावरही राहणार करडी नजर...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**

यंदाच्या संभाव्य एल निनो परिस्थितीमुळे मान्सूनचे आगमन लांबण्याची शक्यता व त्यातून भविष्यात उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईचा धोका लक्षात घेऊन धाराशिव जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील धाराशिव, कळंब, भूम, वाशी आणि परंडा या पाच तालुक्यांमधील १३ पाटबंधारे प्रकल्पांतील उपलब्ध पाणीसाठा पुढील आदेशापर्यंत केवळ पिण्याच्या वापरासाठी राखीव ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी जारी केले आहेत.

जिल्ह्यातील नागरिकांना भविष्यात पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये, तसेच उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करून त्याचा काटकसरीने वापर व्हावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. कार्यकारी अभियंता, धाराशिव पाटबंधारे विभाग क्रमांक १ यांनी सादर केलेल्या अहवालात एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून उपलब्ध जलसाठा पिण्याच्या गरजांसाठी सुरक्षित ठेवण्याची शिफारस करण्यात आली होती. या शिफारशीच्या आधारे जिल्हा प्रशासनाने संबंधित आदेश निर्गमित केले आहेत.

ग्रामीण भागात उन्हाळ्याच्या काळात जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची समस्या अधिक तीव्र होते. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने संबंधित प्रकल्पांतील उपलब्ध पाणी जनावरांच्या पिण्याच्या गरजांसाठीही उपलब्ध राहील, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील पशुपालकांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पावसाळा लांबल्यास आणि पर्जन्यमानात घट झाल्यास पुढील काही महिन्यांत जिल्ह्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. ही संभाव्य परिस्थिती टाळण्यासाठी उपलब्ध जलसाठ्याचा वापर अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्याची आवश्यकता प्रशासनाने अधोरेखित केली आहे. पाणी वाचविणे, अपव्यय टाळणे आणि जलस्रोतांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, संबंधित पाच तालुक्यांतील या १३ पाटबंधारे प्रकल्पांमधील सध्या उपलब्ध असलेला पाणीसाठा पुढील आदेशापर्यंत पिण्यासाठी आरक्षित राहणार आहे. या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या असून, नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या गरजेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

संभाव्य दुष्काळजन्य परिस्थिती आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने घेतलेला हा निर्णय आगामी काळात लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी महत्त्वाचा ठरणार असल्याचे मानले जात आहे.

जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, संबंधित प्रकल्पांमध्ये सध्या समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध नसल्याने उपलब्ध पाण्याचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे या जलस्रोतांमधून होणारा अवैध पाणी उपसा तातडीने थांबविण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. पाणी केवळ नागरिकांच्या पिण्याच्या गरजांसाठी वापरले जावे, यासाठी महसूल, पोलीस आणि पाटबंधारे विभागाने समन्वयाने काम करून कठोर अंमलबजावणी करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

> ### 'या' प्रकल्पांतील पाणी राहणार पिण्यासाठी राखीव
>
> जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार धाराशिव तालुक्यातील अंबेहोळ साठवण तलाव प्रकल्प, उपळा साठवण तलाव क्रमांक १, उपळा साठवण तलाव क्रमांक ३ आणि शेकापूर साठवण तलाव प्रकल्प यांतील उपलब्ध पाणी पिण्याच्या वापरासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. कळंब तालुक्यातील कोठेवाडी लघु पाटबंधारे प्रकल्प आणि चोराखळी साठवण तलाव प्रकल्प, भूम तालुक्यातील नांदगाव साठवण तलाव प्रकल्प, बारगाव प्रकल्प आणि जांब लघु पाटबंधारे प्रकल्प, वाशी तालुक्यातील बोरगाव बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प आणि ई-याचीवाडी लघु पाटबंधारे प्रकल्प, तसेच परंडा तालुक्यातील वाटेफळ साठवण तलाव प्रकल्प आणि साकत मध्यम प्रकल्प यांतील उपलब्ध जलसाठाही पिण्यासाठी आरक्षित करण्यात आला आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बंद खोलीत तिरट जुगारावर छापा; १.०८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ जून -**

अवैध जुगार व्यवसायाविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत तुळजापूर पोलिसांनी देवसिंगा गावालगत असलेल्या हॉटेल सर्जा परिसरात धडक कारवाई करत तिरट जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण १ लाख ८ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.७ जून २०२६ रोजी रात्री सुमारे ८.०६ वाजता तुळजापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने नळदुर्ग रोडवरील देवसिंगा गावालगत असलेल्या हॉटेल सर्जाच्या पाठीमागील बंद खोलीवर छापा टाकला.

या कारवाईदरम्यान जीवन अरुण ज्योत (वय ४४) याच्यासह अन्य सात जण तिरट जुगार खेळत असल्याचे आढळून आले. घटनास्थळी जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य तसेच रोख रक्कम असा एकूण १,०८,०४० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला.

पोलिसांनी जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करून संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ अन्वये तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास तुळजापूर पोलीस करीत आहेत.



# आळणीतील बियर बारच्या आड सुरु असलेल्या तिरट क्लबवर पोलिसांचा धाडसी छापा; २१.९० लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**



धाराशीव जिल्ह्यात अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाने मोहीम अधिक तीव्र केली असून, लातूर-ढोकी रोडवरील अळणी येथे सुरू असलेल्या अवैध तिरट (तीन पत्ती) क्लबवर पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत १२ संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून सुमारे २१ लाख ९० हजार ३०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षकी रीतु खोखर व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.८ जून २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. परि. पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांना मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे आळणी येथील 'दर्शन बियर बार अँड परमिट रूम'च्या आडोशाने अवैधरित्या तिरट क्लब चालवला जात असल्याचे निष्पन्न झाले होते.

माहितीची पडताळणी करून पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकला. संबंधित ठिकाणी पैशांच्या बदल्यात कॉईन्स देऊन जुगार खेळवला जात असल्याचे आढळून आले. बारच्या मागील बाजूस चहूबाजूंनी शेतांनी वेढलेल्या ठिकाणी हा जुगार अड्डा सुरू असल्याने तो सहज नजरेस पडत नव्हता. मात्र पोलिसांच्या अचूक नियोजनामुळे संशयितांना पळून जाण्याची संधी मिळाली नाही. या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सोमवंशी, सुरेश कासुळे, पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र बहुरे तसेच क्यूआरटी आणि आरसीपी पथकातील अधिकारी, अंमलदार व चालक यांनी सहभाग घेतला.

छाप्यामध्ये एकूण १२ संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून बार मालक श्रीपाद नारायण वीर याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळावरून जुगाराचे साहित्य, पत्ते, कॉईन्स, मोबाईल फोन, दोन चारचाकी वाहने, चार दुचाकी वाहने तसेच इतर मुद्देमाल असा एकूण रु. २१,९०,३०५ किमतीचा माल जप्त करण्यात आला.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात पोलीस प्रशासनाची कारवाई पुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

## तुळजाभवानी महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ जून -**

तुळजाभवानी महाविद्यालयात ९ जून रोजी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०८ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. नेताजी काळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख व्याख्यात्या प्रा. वनिता बाबर यांनी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि स्वातंत्र्य चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकला. वंचित, दलित व ग्रामीण समाजासाठी त्यांनी केलेल्या कार्यामुळेच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा विशाल वटवृक्ष उभा राहिल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मंत्री आडे यांनी केले, तर आभार प्रा. गोकुळ बाविस्कर यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम प्राचार्य डॉ. जीवन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

## विलास राठोड यांची राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ जून -**

आलियाबाद (ता. तुळजापूर) येथील सामाजिक कार्यकर्ते विलास तारू राठोड यांची देशातील बंजारा समाजाच्या प्रमुख संघटनांपैकी एक असलेल्या राष्ट्रीय बंजारा परिषद च्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे विविध स्तरांतून स्वागत होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अक्कलकोट येथील शांतीस्थळ येथे संत धावजी बापू महाराज यांच्या पुण्यस्मरण यात्रा महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात ही निवड जाहीर करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष किसनभाऊ राठोड यांच्या हस्ते विलास राठोड यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी महंत जितेंद्र महाराज, डॉ. मोहन चव्हाण, उमेश राठोड, संतोष राठोड, राजेश पवार, शिवाजी राठोड, वसंत पवार आणि किरण राठोड यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विलास राठोड यांचा सत्कारही करण्यात आला. विलास राठोड यांनी यापूर्वी राष्ट्रीय बंजारा परिषदेचे तुळजापूर तालुकाध्यक्ष तसेच धाराशिव जिल्हाध्यक्ष म्हणून यशस्वीपणे जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत संघटनेने त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी समितीवर अशासकीय सदस्य म्हणूनही ते कार्यरत आहेत. 'दिलासा' संस्थेचे विभागीय समन्वयक म्हणून काम करताना त्यांनी सुमारे २०० गावांमध्ये विविध शासकीय व अशासकीय योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे. समाजहित, कार्यतत्परता आणि प्रामाणिक सेवाभाव यांची दखल घेत त्यांची ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

त्यांच्या निवडीबद्दल धाराशिव जिल्ह्यात अभिनंदन करण्यात येत आहे.

## उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी ९८८ मतदार सज्ज; १८ जूनला मतदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ साठी येत्या १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार असून, या निवडणुकीत एकूण ९८८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये ४९९ पुरुष आणि ४८९ महिला मतदारांचा समावेश आहे.

जिल्हानिहाय आकडेवारीनुसार, धाराशिव जिल्हा परिषदेचे ६३ मतदार असून त्यामध्ये २७ पुरुष व ३६ महिला सदस्य आहेत. जिल्ह्यातील दोन नगरपंचायती आणि आठ नगरपालिकांमधील २५४ मतदारांमध्ये १३७ पुरुष व ११७ महिला मतदारांचा समावेश आहे. लातूर जिल्हा परिषदेचे ६९ मतदार असून त्यामध्ये ३२ पुरुष व ३७ महिला सदस्य आहेत. लातूरमधील पाच नगरपंचायती, चार नगरपालिका आणि लातूर महानगरपालिकेतील एकूण ३०२ मतदारांमध्ये १५३ पुरुष व १४५ महिला मतदारांचा समावेश आहे. यापैकी लातूर महानगरपालिकेचे ७७ मतदार असून त्यात ४१ पुरुष व ३६ महिला सदस्य आहेत.

बीड जिल्ह्यातील पाच नगरपंचायती आणि सहा नगरपालिकांमधील ३०४ मतदारांमध्ये १५० पुरुष आणि १५४ महिला मतदारांचा समावेश आहे. निवडणुकीसाठी धाराशिव जिल्ह्यात ८, लातूर जिल्ह्यात १० आणि बीड जिल्ह्यात ११ अशा एकूण २९ मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रे संबंधित जिल्ह्यातील तहसील कार्यालयांमध्ये असणार आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ३२ मतदान केंद्राध्यक्ष आणि १२८ इतर मतदान अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये राखीव मतदान अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. निवडणुकीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी धाराशिव जिल्ह्यात ४, लातूर जिल्ह्यात ५ आणि बीड जिल्ह्यात ५ असे एकूण १४ झोनल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. संबंधित जिल्ह्यांतील उपविभागीय अधिकारी (एसडीओ) झोनल अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. मतदान केंद्रांवर देखरेख ठेवण्यासाठी बँक अधिकाऱ्यांची सूक्ष्म निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. धाराशिवमधील ८ मतदान केंद्रांसाठी ११, लातूरमधील १० मतदान केंद्रांसाठी १३ आणि बीडमधील ११ मतदान केंद्रांसाठी १४ असे एकूण ३८ सूक्ष्म निरीक्षक कार्यरत राहणार आहेत.

दरम्यान, १७ जून रोजी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयातून मतदान साहित्याचे वितरण करण्यात येणार आहे. मतदानानंतर साहित्याची स्वीकृती १८ जून रोजी धाराशिव येथील भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत करण्यात येईल. तसेच या निवडणुकीची मतमोजणी २२ जून २०२६ रोजी याच ठिकाणी होणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

## मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविणाऱ्या दोघांवर भुम पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**

मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालवून मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या दोघांविरुद्ध भुम पोलिसांनी स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अप्पासाहेब रघुनाथ हाके (वय ३८, रा. रामकुंड, ता. भुम) हे दि. ८ जून २०२६ रोजी रात्री ८.२२ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या ताब्यातील एमएच ०२ डीएच ५१०९ क्रमांकाची मोटारसायकल मद्यधुंद अवस्थेत चालवत होते. तसेच तय्यब अब्दुलखॉ पटेल (वय ६५, रा. भुम) हे एमएच २५ जे २५९४ क्रमांकाची मोटारसायकल मद्यधुंद अवस्थेत चालवत असल्याचे आढळून आले.

मस्कर बुक डेपोसमोर, गोलाई चौक, भुम येथे करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान दोघेही मद्यप्राशन करून वाहन चालवत असल्याचे निष्पन्न झाले.

## जिल्हाधिकाऱ्यांचा तीर्थ बुद्रुकमध्ये मुक्कामी दौरा; ग्रामस्थांशी थेट संवादातून विकासाला नवी दिशा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जून -**

प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाचा प्रमुख गावात मुक्कामी राहून थेट ग्रामस्थांशी संवाद साधत असेल, तर त्याचे सकारात्मक परिणाम कसे होऊ शकतात याचा प्रत्यय तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक येथे आला.

जिल्हाधिकारी कीर्तीकुमार पुजार यांनी शुक्रवार, दि. ५ जून रोजी तीर्थ बुद्रुक येथे मुक्कामी दौरा केला. या दौऱ्यात तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच तालुका प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. गावात मुक्कामी थांबून जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ औपचारिक पाहणी न करता ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. यावेळी नागरिकांच्या अडचणी, समस्या आणि अपेक्षा जाणून घेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. विशेषतः वैयक्तिक लाभाच्या शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे, पायाभूत सुविधांची गरज आणि स्थानिक विकासाशी संबंधित प्रश्नांवर ग्रामस्थांनी आपली मते मांडली. या संवादातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सुस्पष्ट विकास आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने दिशा निश्चित करण्यात आली. ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून गावाचा विकास आराखडा अधिक प्रभावी आणि वास्तवदर्शी करण्यावर भर देण्यात आला.



दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गावात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे श्रमदान करून गाव परिसर स्वच्छ करण्यासाठी योगदान दिले.

यानंतर शिवार फेरी काढून शेतांमधील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. तसेच एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण झाल्याचे दिसून आले. जिल्हाधिकाऱ्यांचा हा मुक्कामी दौरा केवळ प्रशासकीय पाहणीपुरता मर्यादित न राहता प्रशासन थेट जनतेच्या दारात पोहोचल्याचा अनुभव देणारा ठरला. ग्रामस्थांशी झालेला थेट संवाद आणि विकास प्रक्रियेत त्यांचा प्रत्यक्ष सहभाग यामुळे प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाल्याच्या भावना गावकऱ्यांनी व्यक्त केल्या.

ग्रामीण विकासासाठी प्रशासनाने राबविलेल्या अशा मुक्कामी दौऱ्यांमुळे शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होत असून, स्थानिक समस्यांचे निराकरण अधिक वेगाने होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची दशकपूर्ती...

## सास्तूरमध्ये १०५ गरोदर मातांची मोफत तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.९ जून -**

देशातील माता मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि गरोदर मातांना सुरक्षित आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाने' गेल्या दहा वर्षांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातील गरोदर महिलांपर्यंत गुणवत्तापूर्ण, नियमित आणि मोफत आरोग्य सेवा पोहोचविण्यात या अभियानाने महत्त्वाची भूमिका बजावली असून, याच प्रयत्नांमुळे देश व राज्य पातळीवर माता मृत्यूदरात मोठी घट झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

या अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त स्पर्श ग्रामीण रुग्णालय, सास्तूर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या आदेशानुसार तसेच रुग्णालयाचे प्रकल्प अधिकारी रमाकांत जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दर महिन्याच्या ९ तारखेला 'आरोग्य विषयक नऊचा संकल्प' मोहिमेअंतर्गत गरोदर मातांसाठी विशेष तपासणी शिबिर आयोजित करण्यात येते. याच उपक्रमांतर्गत यावेळी मोठ्या प्रमाणावर गरोदर मातांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बोलताना प्रकल्प अधिकारी रमाकांत जोशी यांनी सांगितले की, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाने गेल्या १० वर्षांत माता मृत्यूदर कमी करण्यात मोठे योगदान दिले आहे.



ग्रामीण भागातील प्रत्येक गरोदर मातेपर्यंत तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा, आवश्यक तपासण्या आणि योग्य उपचार वेळेत पोहोचविणे हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. दशकपूर्तीनिमित्त राज्यभर विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत असून, मातृ सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जात आहे.

या विशेष शिबिरामध्ये स्पर्श ग्रामीण रुग्णालय, सास्तूर येथे तब्बल १०५ गरोदर मातांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

यामध्ये हिमोग्लोबिन तपासणी, रक्तगट तपासणी, युरीन अल्ब्युमिन तपासणी, OGTT द्वारे गरोदरपणातील मधुमेह तपासणी, हिपॅटायटिस-बी, सिफिलिस तपासणी तसेच मोफत सोनोग्राफी करण्यात आली.

ग्रामीण भागातील महिलांना दर्जेदार आरोग्य सेवा सहज उपलब्ध करून देण्यासाठी स्पर्श ग्रामीण रुग्णालय सातत्याने विविध आरोग्य उपक्रम राबवत असून, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाच्या माध्यमातून अनेक गरोदर मातांना मोठा दिलासा मिळत असल्याची भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

## मद्यधुंद अवस्थेत गैरवर्तन केल्याचा उपअभियंत्यावर आरोप; चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ जून -**

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कळंब येथील उपअभियंत्याने खोंदला येथे शेतकऱ्यांच्या आंदोलनादरम्यान मद्यधुंद अवस्थेत महिलांसमोर गैरवर्तन केल्याचा आरोप मानवी हक्क अभियान व श्रमिक मानवाधिकार संघटनेने केला असून संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध चौकशी करून कारवाई करण्याची मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दि.१ जून २०२६ रोजी मौजे खोंदला (ता. कळंब) येथे शेतरस्त्याच्या कामासंदर्भात शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन केले होते. या आंदोलनाची पूर्वसूचना प्रशासनाला देण्यात आली होती. आंदोलनस्थळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता उपस्थित झाले असता त्यांनी कथितपणे मद्यधुंद अवस्थेत महिलांसमोर गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

संघटनेच्या मते, अशा प्रकारचे वर्तन हे शासकीय पदाच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे असून उपअभियंता पदाला काळिमा फासणारे आहे. तालुकास्तरीय जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकाऱ्याने शिस्त, संयम व संवेदनशीलता जपणे अपेक्षित असताना घडलेल्या या कथित प्रकारामुळे शासन, प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रतिमा मलीन झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर उपलब्ध असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्याची कायद्यानुसार कानउघाडणी व आवश्यक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, मागणीची दखल न घेतल्यास ८ जून २०२६ रोजी कळंब-येरमाळा मार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मानवी हक्क अभियानचे बजरंग ताटे व जिल्हाध्यक्ष माया शिंदे यांनी दिला आहे.

